निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
२५ डिसेबंर २०२५
पाने: ०४ । किंमत: २ .००
वर्ष: १५ वे । अंक: ३०० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## ‘माझ्याकडं खूप व्हिडिओ आहेत हं!’

### शिवसेना-मनसे युतीची घोषणा करताच लाव रे तो व्हिडिओ म्हणणाऱ्या राज ठाकरेंचा सूचक इशारा नेमका कोणाला?

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/पुणे/ प्रतिनिधी**/ गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम देत ठाकरे बंधूंनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी युतीची घोषणा केली. आज युतीची औपचारिक घोषणा करताना राज आणि उद्धव ठाकरे काय बोलणार याकडे सुद्धा राजकीय वर्तुळाचे लक्ष होतं. यावेळी बोलताना राज यांनी सुद्धा अत्यंत मोजक्या शब्दांमध्ये भाजपला सूचक इशारा दिला. जेव्हापासून राज आणि उद्धव यांची युती होणार याबाबत बोलणी सुरु झाली तेव्हापासून त्यांची जुनी विधाने तसेच व्हिडिओ सुद्धा बाहेर काढण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात आहे. या मुद्द्यावर राज ठाकरे यांनी सुद्धा अत्यंत सुचक शब्दांमध्ये इशारा दिला.





**माझ्याकडे सुद्धा खूप व्हिडिओ आहेत**

राज ठाकरे यांनी सांगितले की मुख्यमंत्र्यांचा सुद्धा व्हिडिओ फिरत आहे. त्यामध्ये ते अल्लाहू अकबर म्हणत आहेत. त्यांनी या गोष्टी आम्हाला सांगू नयेत. माझ्याकडे सुद्धा खूप व्हिडिओ आहेत असं म्हणत राज यांनी सूचक इशारा दिला. या गोष्टी त्यांनी सांगू नयेत. माझ्याकडे खूप व्हिडिओज आहेत. ते काय बोलतात त्याच्यावर माझे व्हिडिओ तयार असतील. तत्पूर्वी राज यांनी घो-षणा करताना सांगितलं की, बरेच दिवस प्रतीक्षा महाराष्ट्र करत होता त्या शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती झाली हे आज आम्ही जाहीर करत आ-होत. जे निवडणुका लढवणार आहेत त्या लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. अर्ज केव्हा भरायचा ते आपल्याला कळवल जाईल. ज्यांचं मुंबईवर, महाराष्ट्रावर, मराठी माणसावर प्रेम आहे अशा सर्व माझ्या पत्रकार बांधवांनी आमच्या मागे उभं राहा, असे आवाहनही त्यांनी केले.

### त्याचा राजकारणात खात्मा केल्याशिवाय राहणार नाही

दरम्यान, उद्धव ठाकरे म्हणाले की, यापुढे मुंबई आणि महाराष्ट्रवरती कोणी वाकड्या नजरेने किंवा त्यांच्या कपटी कारस्थानाने महाराष्ट्राला मुंबईपासून किंवा मुंबईला महाराष्ट्रपासून मराठी माणसापासून तोडण्याचा प्रयत्न करेल त्याचा राजकारणात खात्मा केल्याशिवाय राहणार नाही शपथ घेऊन आम्ही मैदानात उतरलो आहोत. मराठी माणसाला आवाहन करताना त्यांनी स्पष्ट केले की, आता जर का चुकाल तर संपाल. आता जर फुटाल तर पूर्णपणे संपून जाल, म्हणून परत एकदा तुटू नका, फुटू नका आणि मराठीचा वसा टाकू नका हाच एक संदेश मी आमच्या आज दोघांच्या युतीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्राला देतो आहे.

## संक्षिप्त



### नाताळ, नववर्षानिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/पुणे/ प्रतिनिधी**/ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नाताळ तसेच नववर्षानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.



जगातील अनेक देशांमध्ये साजरा केला जाणारा नाताळचा सण भगवान येशू ख्रिस्तांच्या जीवन कार्याचे स्मरण करुन देतो. त्यांचा जन्मोत्सव असलेला हा सण जगात शांतता तसेच मनामनात सामंजस्य व सद्भावना निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास वाटतो. सर्वांना नाताळ तसेच आगामी नववर्ष २०२६ निमित्त हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपाल देवव्रत यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी ठाकरे बंधूंच्या युतीची टिंगल उडवली

### म्हणाले, 'मला वाटलं झेलेन्स्की अन् पुतीनच एकत्र आले'

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/पुणे/ प्रतिनिधी**/ आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी बुधवारी मुंबईत शिवसेना-मनसे युतीची घोषणा केली. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना ठाकरे बंधूंची अक्षरशः टर उडवली.



उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्र येण्याने फार काहीतरी घडेल, असा कोणाचा समज असेल तर तो बाळबोध आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. ठाकरे यांनी सातत्याने मराठी माणसाचा विश्वासघात केला. त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड हा भ्रष्टाचार आणि स्वहिताचा राहिला आहे. त्यामुळे यंदा मुंबईची जनता त्यांच्या भावनिक आवाहनाला भुलणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना-मनसे युतीची टिंगल उडवताना जोरदार राजकीय फटकेबाजी केली. त्यांनी म्हटले की, मी सहज टीव्ही बघतो होतो. त्यावेळी काही माध्यमं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीचा कार्यक्रम असा दाखवत होती की, जणूकाही रशिया युक्रेनची युती होत आहे. इकडून झेलेन्स्की निघाले, तिकडून पुतीन निघाले आणि ही युती झाली. कुठल्याही एखाद्या पक्षाला निवडणुकीत आपले अस्तित्व टिकवायला जे काही करावे लागते तेच हे दोन्ही पक्ष करत आहेत. या दोन्ही पक्षांनी राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी हे केले आहे. त्यापलीकडे या सगळ्याचा फार काही अन्वयार्थ काढण्याची गरज नाही. यामुळे फारकाही परिणाम होईल, असे वाटत नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

ज्याप्रकारे या मंडळींनी सातत्याने मुंबईकरांचा विश्वासघात केला आहे, मराठी माणसाला मुंबईबाहेर घालवायचे काम केले आणि पाप केले आहे, त्यामुळे मराठी माणूस त्यांच्यासोबत नाही. मुंबईत यांच्यासोबत यायला कोणीही तयार नाही. यांचा ट्रॅक रेकॉर्ड केवळ भ्रष्टाचार आणि स्वहिताचा राहिला आहे. केवळ निवडणुका जवळ आल्या की भावनिक बोलायचे. पण जनता आता या भावनिक बोलण्याला भुलण-ारी नाही. त्यामुळे त्यांनी या निवडणुकीसाठी आणखी दोन-चार जण सोबत घेतले तरी मुंबईकर महायुतीचे काम बघूनच मतदान करतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. देवेंद्र फडणवीस यांच्या या टीकेला आता ठाकरे बंधू काय प्रत्युत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## ‘कोकण’च शिवसेनेचा बालेकिल्ला; मालवणमध्ये राणेंच्या नेतृत्वात

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मालवण/ प्रतिनिधी**/ शिवसेनेचाच बालेकिल्ला असल्याचे नगर परिषदेच्या निवडणुकीत मतदारांनी दाखवून दिले आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांची एकसंध शिवसेना असताना मालवण शहर आणि तालुका हा नेहमीच शिवसेनेच्याच पाठीशी राहिला होता. त्यानंतर शिवसेनेत फूट पडल्यानंतर आता झालेल्या नगरपरिषदेच्या या निवडणुकीमध्ये महायुती तुटल्यामुळे भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात स्वतंत्र लढती झाल्या. पैशाचा पाऊस पडूनही मालवणवासीय मतदारांनी आपला कौल शतप्रतिशत शिवसेनेलाच असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.




**तालुक्यात शिवसेनेचे संघटन झाले अधिक मजबूत :** बाळासाहेबांच्या काळातील शिवसेनेचे संघटन अजूनही लोकांच्या मनामध्ये भिनली असल्यामुळे उद्धव शिवसेना आणि बाळासाहेबांची शिवसेना नसली तरी मालवण शिवसेने-चेच राहिले असल्याचा शिक्कामोर्तब नगर परिषदेच्या निवडणुकीवरून दाखवून दिले आहे. ग्रामीण भागातही मालवण आणि कुडाळ या दोन्ही तालुक्यात शिवसे-नेचे संघटन अधिक मजबूत झाल्याचे बोलले जात आहे, कोकण म्हटले की शिवसेना है समीकरण आहे. मध्यंतरीच्या काळात शिवसेना दुभंगल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिदे शिवसे-नेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी राज्यात आणि कोकणात शिवसेना जोमाने वाढविण्यासाठी प्रयत्न केले. मध्यंतरीच्या काळात उद्धव ठाकरे शिवसेनेचे खासदार विनायक राऊत यांचा पराभव झाला.

निवडणुकीपूर्वी भाजपने पत्रकार परिषद घेऊन शिंदे शिवसेनेला केवळ चार जागांची ऑफर दिली होती. शिदे शिवसेना मालवणात शून्य आहे, असे वक्तव्य करत भाजपने त्यांना डिवचले होते. हा अपमान जिव्हारी लागलेल्या आमदार नीलेश राणे वानी सर्वे २० जागांवर वर्चस्व मिळविण्याचा निर्धार केला. आजच्या निकालाने राणे यांनी भाजपध्या टीकेला चोख प्रत्युत्तर दिल्याचे दिसून आले, नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या तिरंगी लहतीत शिदि शिवसेनेच्या ममता वराडकर यांनी बाजी मारली, त्या मालवणव्या १६ व्या माराध्यक्ष बनल्या आहेत, ठाकरे शिवसेनेच्या पूजा करलकर दुसऱ्या स्थ-ानी, तर भाजपाच्या शिल्पा खीत तिसऱ्या स्थानी राहिल्याचे दिसून आले. भाजपला रामराम करत शिंदे शिवसेनेत गेलेल्या ममता वराडकर यांना मतदारांनी कौल दिला.

### लढणाऱ्या स्वबळावर भाजप-ला मोठा धक्का

विधानसभा निवडणुकीत भाजपात असलेले निलेश राणे यांना तिकीट न मिळाल्यामुळे त्यांनी शिंदे शिवसेनेत प्रवेश करत एकनाथ शिंदे याच्याकडून तिकीट मिळविले आणि विजयश्रीही खेचून आणली. निलेश राणे यांनी कुडाळ-मालवण विधानसभा मतदारसंघात कुडाळ नगरपरिषद आपल्या ताब्यात ठेवली, त्याच दरम्यान नुकत्याच झालेल्या मालवण नगर परिषदेच्या निवडणुकीत सुद्धा त्यानी शतप्रतिशत शिवसेना मालवणमध्ये असल्याचे व ताकद पणाला लावत शिंदे शिवसेनेला प्रमाणात बळ देत मालवण नगरपरिषदेवर शिवसेनेचा झेंडा पुन्हा फडकवला, आमदार निलेश राणे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने १० जागासह नगराध्यक्ष पदावर कब्जा मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

## टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडियात निवड होताच ईशान किशनचा धमाका!

### ३३ चेंडूत ठोकलं शतक, काही तासात वैभव सूर्यवंशीचा रेकॉर्ड उद्ध्वस्थ

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/पुणे/ प्रतिनिधी**/ इशान किशनने विजय हजारे ट्रॉफी २०२५ची सुरुवात अगदी त्याच जबरदस्त फॉर्ममध्ये केली आहे, ज्या फॉर्ममध्ये त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीचा शेवट चॅम्पियन म्हणून केला होता. कर्नाटकविरुद्धच्या सामन्यात इशानने अवघ्या ३३ चेंडूमध्ये तुफानी शतक झळकावत इतिहास रचला. या कामगिरीसह तो लिस्ट ‘ए’ क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतक करणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. काही तासांपूर्वीच वैभव सूर्यवंशीने ३६ चेंडूमध्ये शतक झळकावले होते, मात्र इशानने त्यालाही मागे टाकत नवा विक्रम आपल्या नावावर केला.

**टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडियात निवड होताच ईशान किशनचा धमाका!**

इशान किशनचा हा फॉर्म काही योगायोग नाही. नुकत्याच पार पडलेल्या सय्यद मुश्ताक अली टी-२० ट्रॉफी



२०२५मध्ये त्याने ५०० हून अधिक धावा करत सर्वाधिक धावसंख्या करणारा फलंदाज बनण्याचा मान मिळवला होता. त्याचबरोबर, त्याच्या नेतृत्वाखाली झारखंडने पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकली होती. या शानदार कामगिरीचे फळ म्हणजे तब्बल दोन वर्षांनंतर टीम इंडियात पुनरागमन आणि टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या संघात निवड झाली. कर्नाटकविरुद्ध इशानने ३९ चेंडूमध्ये १२५ धावा ठोकल्या.

### भारतीय खेळाडूंनी केलेले सर्वात वेगवान लिस्ट ए शतकं

- ३३ चेंडू – इशान किशन, झारखंड वि. कर्नाटक (आज)
- ३५ चेंडू – अनमोलप्रीत सिंग, पंजाब वि. अरुणाचल प्रदेश, २०२४
- ३६ चेंडू – वैभव सूर्यवंशी, बिहार वि. अरुणाचल प्रदेश (आज)
- ४० चेंडू – युसूफ पठाण, बडोदा वि. महाराष्ट्र, २०१०
- ४१ चेंडू – उर्विल पटेल, गुजरात वि. आंध्र प्रदेश, २०२३

या खेळीत ७ चौकार आणि १४ षटकार होते, ज्यामुळे प्रेक्षक अक्षरशः थक्क झाले.

इशानच्या या स्फोटक खेळीपूर्वीच १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने विजय हजारे ट्रॉफीमध्ये धडाकेबाज सुरूवात केली होती. त्याने ८४ चेंडूमध्ये १९० धावांची ऐतिहासिक खेळी खेळली, ज्यात १६ चौकार आणि १५ षटकार मारले होते. या खेळीत वैभवने अनेक मोठे विक्रम मोडले. तो लिस्ट ‘ए’ क्रिकेटमधील सर्वात तरुण शतकवीर ठरला, तसेच एबी डिव्हिलियर्सचा सर्वात वेगवान १५० धावांचा जागतिक विक्रमही मोडला. काही तासांतच वेगवान शतकाच्या यादीत वैभव मागे पडला आणि इशान किशनने बाजी मारली.

**झारखंडकडून कर्नाटकला ४१३ धावांचे आव्हान**

इशान किशनच्या तुफानी खेळीच्या जोरावर झारखंडने ५० षटकांत ९ बाद ४१२ धावा केल्या. कर्नाटकसमोर विजयासाठी ४१३ धावांचे अवघड लक्ष्य ठेवण्यात आले आहे. इशानशिवाय विराट सिंगने ८८, कुमार कुशाग्रने ६३, तर सलामीवीर शिखर मोहनने ४४ धावांचे योगदान देत झारखंडच्या धावसंख्येला चांगला आकार दिला. विजय हजारे ट्रॉफी २०२५ च्या पहिल्याच दिवसा-पासून भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये विक्रमी खेळींचा महापूर पाहायला मिळत आहे.

## शिक्षकी पेशाला काळीमा

### आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या आठवीच्या विद्यार्थिनीवर मुख्याध्यापकाकडून नको ते कृत्य

**आत्ताच एक्सपप्रेस**

**नंदुरबार/पुणे/ प्रतिनिधी**/ नंदुरबारच्या शासकीय आदिवासी आश्रम शाळेतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. यात आश्रम शाळेत शिकणाऱ्या आठवीच्या विद्यार्थिनीवर मुख्याध्यापकाकडून बलात्कार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आलाय.

नंदुरबारच्या शासकीय आदिवासी आश्रम शाळे-तून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. यात आश्रम शाळेत शिकणाऱ्या आठवीच्या विद्यार्थिनीवर मुख्याध्यापकाकडून बलात्कार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आलं आहे. विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची माहिती आहे. तर विद्यार्थिनीने घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितल्यानंतर हा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी धडगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहे. मात्र या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**मुख्याध्यापकसह वस्तीगृहाच्या व्यवस्थापिकेवर गुन्हा दाखल**

दरम्यान, या प्रकरणी शासकीय आश्रम शाळा तलाईच्या मुख्याध्यापकसह वस्तीगृहाच्या व्यवस्थापिकेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर नराधम मुख्याध्यापक रायसिंग वस-ावे आणि व्यवस्थापिका मालती पाडवी यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आलाय. दुसरीकडे हि घटना उघडल्यानंतर आदिवासी संघटनांमध्ये संतापाचे वातावरण निर्मण झालं असून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे. तर या घटनेनं आदिवासी आश्रम शाळांमधील मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मोहाडीतील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील घाणीनं विद्यार्थ्यांचं आरोग्य धोक्यात; संतप्त विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांना धरलं धारेवर

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि अभ्यासिका केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी आणि घाण पसरल्यानं अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. भंडाऱ्याच्या मोहाडी नगरपंचायत प्रशासनाच्या वतीनं हुतात्मा स्मारक इथं अभ्यासिका आणि मार्गदर्शन केंद्र उभारलं आहे. त्यामुळं स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या परिसरात असलेली दुर्गंधी तात्काळ दूर करावी आणि अभ्यासिकेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्यासाठी परिसर स्वच्छ आणि सुंदर करून चांगल्या वातावरणाची निर्मिती करून द्यावी, या मागणीला घेऊन अभ्यासिकेच्या संतप्त विद्यार्थ्यांनी नगरपालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना चांगलेचं धारेवर धरलं.

# महावितरणची ‘ग्राहक राजासाठी’ तत्पर डिजीटल सेवा




वीज ही अत्यावश्यक सेवेतील मुलभूत घटक आहे. आधुनिक जीवनशैलीत जीवन जगतांना क्षणा क्षणाला विजेची आवश्यकता भासते. ’ विजेशिवाय मानवी जीवन अधुरे आहे’ असे म्हटले तरी वावगे ठरू नये. आधुनिकीकरणच संपूर्ण विजेवर अवलंबुन आहे. विजेशिवाय विकासही अशक्य आहे. राज्याला गेल्या ६६ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म्हणजेच आताची ’’महावितरण’’ ही राज्यातील शहरी, निमशहरी, दुर्गम, अतिदुर्गम व दऱ्याखोऱ्यात असलेल्या सर्व घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी, पथदिवे, सार्वजनिक पाणीपुरवठा व इतर सर्व वीजग्राहकांशी प्रकाशाचे, विश्वासाचे नाते अभेद्य ठेवत ग्राहक सेवा देत आहे व आश्वासक वाटचाल करीत आहे. २४ डिसेंबर रोजी ’’भारतीय ग्राहक दिन’’ निमित्त महावितरण कंपनी स्वस्त दरात सर्वांना अखंडित आणि दर्जेदार वीज देण्याचे राष्ट्रीय ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यास वचनबद्ध आहे. ग्राहक सेवेची दखल घेवून अनेक राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. नुकतेच ’मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५,९११ सौर कृषिपंप लावण्याचा जागतिक उच्चांक गाठला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली आहे.

राज्यातील सर्व वर्गवारीतील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणा विकसित करणे, संचालन करणे आणि देखभाल करणे ही महावितरणची मुख्य उद्दिष्टे आहेत. विद्युत कायदा २००३ च्या कलम १४ नुसार डिम्ड डिस्ट्रीब्यूशन परवानाधारक म्हणून, शेवटच्या ग्राहकापर्यंत वीज पुरवठा करण्यासाठी सक्षम वीज वितरण यंत्रणा ऊभारण्याचा व त्याची देखभाल करण्याचा वीज वितरण व्यवसाय महावितरण सांभाळत आहे.महावितरणकडून मुंबई शहर वगळता काही उपनगरांसह उर्वरित महाराष्ट्रात वीज पुरवठा केला जातो. सुमारे ७० हजारांपेक्षा अधिक कर्मचारी, ३ कोटी ५० लाखांवर ग्राहक संख्या व वीज पुरवठ्याच्या दृष्टीने महावितरण ही देशातील व आशियातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे.

पायाभूत सुविधांच्या बाबतीत, महावितरण कंपनीकडून ३३/११ किव्हो क्षमतेचे ४००० पेक्षा अधिक उपकेंद्र आणि स्विचिंग स्टेशन्स, २५ हजार उच्चदाब वीज वाहिन्या, सुमारे ८ लाख वितरण रोहित्रे, ११ किव्हो क्षमतेच्या ३ लाख ३० हजार किमी वाहिन्या आणि ३३ किव्हो क्षमतेच्या ५० हजार किमी वाहिन्यांचा समावेश असलेल्या विशाल वितरण यंत्रणेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ३.०८ हजार चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रामधील ४१ हजार ९२८ गावे आणि ४५७ शहरांमध्ये वीजपुरवठा करण्यात येत आहे. सध्या, महावितरण कंपनीच्या सांघिक कार्यालयाच्या अखत्यारित ४ प्रादेशिक कार्यालये, १६ परिमंडल कार्यालये, ४६ मंडल कार्यालये, १४७ विभागीय कार्यालये आणि ६५२ उपविभागीय कार्यालयांचा समावेश आहे.महावितरणकडून विविध वीज निर्मिती कंपन्यांसोबत ३३ हजार ७५५ मेगावॅट वीज खरेदीचा करार आहे. त्यापैकी ८०२७ मेगावॅट ही अक्षय ऊर्जा आहे. महावितरणकडे मार्च २०१२ पासून मागणीप्रमाणे वीजपुरवठा करूनही शिल्लक विजेची स्थिती आहे. तसेच एप्रिल २०२१ मध्ये विजेची २२ हजार ८३२ मेगावॅटची सर्वोच्च मागणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. महावितरणची एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक (-ढउ) वीजहानी आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये ३३.८९ टक्क्यांवरून कमी होऊन आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये २०.७३ टक्क्यांवर आली आहे. ही वीजहानी राष्ट्रीय सरासरी हानीपेक्षा म्हणजे २३ टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

कंपनीकडून ग्राहक समर्पित पोर्टलद्वारे आणि मोबाइल ऐपद्वारे डिजिटल प्लॅटफॉर्मवर नवीन वीजजोडणी, वीज भारात बदल, नाव बदलणे, तक्रार निवारण, पर्यावरणपूरक गो-ग्रीन योजना, वीज पुरवठा बंद किंवा खंडितबाबत माहिती इत्यादी विविध ग्राहक सेवा प्रदान करण्यात येत आहे. ऊर्जा क्षेत्रात होत असलेल्या तांत्रिक प्रगतीला आणखी गती देण्यासाठी महावितरण कंपनी माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे नवनवीन व दर्जे दार ग्राहकसेवांची अंमलबजावणी करीत आहे. सर्व उच्चदाब ग्राहकांना ऑटोमैटिक मीटर रिडींग/ एडवांस्ड मीटरींग इन्फ्रास्ट्रक्चर (-चठ/-चख ) उपलब्ध करून देण्यात आले आहे. दर्जेदार ग्राहक सेवा आणि आवश्यक तेवढाच खर्च करण्यावर कंपनी अधिक भर देते. पुढील उद्दिष्ट गाठण्यासाठी येत्या पाच वर्षामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर व यंत्रणेचे बळकटीकरण करण्यावर कंपनी भर देणार आहे. ज्यामुळे वीज हानी १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल. सोबतच प्रत्येक वाहिनीवरील वीज वापर व होणारे नुकसान याचा काटेकोर हिशेब ठेवण्यासाठी ‘सबस्टेशन मॉनिटरिंग स्कीम’ ही योजना प्रस्तावित आहे. तसेच भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या निर्देशानुसार स्मार्ट मीटर लावण्याची योजना देखील आखण्यात येत आहे.

आशिया खंडातील नामांकित, सर्वात मोठी व तत्पर ग्राहक सेवेमुळे अनेक पदकांचे तुरे शिरपेचात रोवलेली अशी महावितरण कंपनीची सर्वदूर ख्याती आहे. महावितरण वीजग्राहकांना अखंड, सुरळित व दर्जेदार २४ ु ७ तास वीजपुरवठा करण्याचे काम करत आहे. महावितरण आधुनिक युगात दिवसेनं दिवस काळाची गरज लक्षात घेता सेवेत सतत सुधारणा करत वीज ग्राहकांना दर्जेदार सेवेबरोबरच विनाकष्ठ सुलभ डिजीटल सेवा देण्याचा प्रयत्न सातत्याने करत आहे. वीज ग्राहकांना या सेवा प्रदान करतांना महावितरण अत्याधुनिक सेवेकडे पाउल टाकत नवनवीन संशोधात्मक ई सेवा देण्याकडे प्राधान्य दिले जात आहे. म्हणूनच महावितरण ही वीज सेवा देणारी आशिया खंडातील सर्वात मोठी कंपनी म्हणून ओळखली जाते. महावितरणचे हे ’लौकिक’ अविरत सेवेने टिकवून ठेवण्यासाठी कर्मचारी सतत प्रत्नशिल आहेत. २४ डिसेंबर रोजी ’’ भारतीय ग्राहक दिन ’’ निमित्त महावितरणच्या ग्राहकाभिमुख डिजीटल सेवांचा ग्राहकांनी पुरेपुर लाभ घेतला पाहिजे.

**मुलभूत प्राथमिक सेवा**

विजेच्या मुलभुत समस्या जाणून घेवून तेथेच या समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने लोबंकळणा-या तारा सरळ करणे, झुकलेले खांब सरळ करणे, वाहिन्यांवरील झाडांच्या फांदया काढणे, वितरण रोहित्रांचे बॉक्स आणि केबल दुरूस्त करणे, नव्याने आर्थिंग करणे, गंजलेले खांब बदलणे, सिंगलफेजचे नादुरूस्त मिटर बदलणे, घरात असणारे वीज मीटर दाराबाहेर लावणे, चुकीचे वीज बिल दुरूस्त करणे, प्रलंबित नवीन वीज जोडणी देणे, एबी स्वीच बदलणे, रोहित्राभोवती असणारे गवत काढून स्वच्छ करणे, वीज चोरीचे आकडे काढणे आदी कामे करण्यात येत आहेत. तसेच वीज अपघात टाळण्यासाठी लोकप्रबोधन करणे, ऑनलाईन वीज बिल भरणे, नवीन वीज जोडणीची मागणी करणे इत्यादी सुविधांची प्रात्यक्षिक मोबाईलवर गावातील लोकांना करून दाखविणे. वीज बिल वसूल करणे इत्यादी उपक्रम या गावात करण्यात येत आहेत.

**टोल फ्री २४ X ७ कॉल सेंटर**

महावितरणने ग्राहकांसाठी २४ तास सुरू असणारे मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्रातून २४ ु ७ अशी टोल फ्री क्रमांकावरून कॉल सेंटर सुरू केलेले आहे. वीज सेवेबाबत तक्रारीसाठी दूरध्वनी व मोबाईलधारकांसाठी १९१२, १९१२०, १८००-२१२-३४३५ व १८००-२३३-३४३५ हे तीन टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. प्रामुख्याने खंडित वीजपुरवठ्यासह विविध प्रकारच्या तक्रारी या क्रमांकांवर करता येतात. ग्राहकांना तक्रार क्रमांक देण्यात येतो. तक्रारींचे निराकरण करण्याची कार्यवाही लगेच सुरू होते.

**गो-ग्रीनमध्ये ई-बिलाची सुविधा**

छापील बिलासह दरमाह ई-मेलवर वीजबिल मिळवण्यासाठी महावितरणच्या ु.ारहरवळीलो.ळप या वेबसाईटवर किंवा लेर्पीीाशीळपषे.ारहरवळीलो.ळप या लिंकवर नोंदणी करावी. तेथे ग्राहक प्रकार (लघुदाब/उच्चदाब), ग्राहक क्रमांक व बिलिंग युनिट हा तपशील भरावा. त्यानंतर मोबाईल क्रमांक व ई-मेल टाकून एसएमएस सेवा व बिलाचा ई-मेल मिळवता येईल. या सेवेबरोबरच दरमाह छापील बिलही मिळण्याची सोय कायम राहील.

**गो-ग्रीन ई-बिलात १० रू. सुट**

या सुविधेत छापील बिलाऐवजी ई-मेलद्वारे बिल मिळवण्याचा पर्याय लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांना उपलब्ध आहे. गो-ग्रीनअंतर्गत ई-बिलाचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना बिलात १० रुपये सूट दिली जाते. ु.ारहरवळीलो.ळप या वेबसाईटवर गो-ग्रीन लिंकवर क्लिक करून ग्राहक क्रमांक व बिलिंग युनिट ही माहिती भरल्यास नोंदणी पूर्ण होईल. ही सुविधा केवळ महावितरणच्या नोंदणीकृत ग्राहकांसाठीच उपलब्ध असून ग्राहकांनी http://wss.mahadiscom.in/wss/wss या लिंकवर जाऊन आपली नोंदणी झाल्याची खात्री करून घ्यावी.

**एसएमएसद्वारे वीजबिल व इतर सेवा**

ग्राहकांना वीजबिलाचा तपशील, वीजपुरवठा बंद असल्याचा कालावधी किंवा देखभाल व दुरुस्तीच्या कालावधीची माहिती एसएमएसद्वारे पाठवण्यात येते. त्यासाठी ग्राहक क्रमांकासोबत मोबाईल क्रमांक नोंदवणे आवश्यक आहे. लेर्पीीाशीळपषे.ारहरवळीलो.ळप या लिंकवर किंवा टोल फ्री क्रमांकावर नोंदणी करता येते. तसेच नोंदणी करावयाच्या मोबाईल क्रमांकावरून चठएऋ टाईप करा व त्यापुढे स्पेस देऊन आपला ग्राहक क्रमांक टाकून ९२२५५९२२५५ या क्रमांकावर पाठवा.

**ग्राहकसेवा ’’ मोबाईल ॲपवर ’’**

महावितरणचे मोबाईल ॲप इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध असून, अँड्रॉईड, विंडोज व आयओएस ऑपरेटिंग सिस्टिमच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड होते. महावितरणच्या वेबसाईटसह विंडोज स्टोअर, गुगल प्लेस्टोअर व ॲपल ॲपस्टोअर या प्लॅटफॉर्मवरून डाऊनलोड करता येते. ऑनलाईन बिल भरणा सुविधा www.mahadiscom.in या वेबसाईटवर व महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. या ॲपमधून नवीन जोडणीची मागणी करता येते. चालू व मागील बिल पाहता येते. ते भरण्यासाठी नेटबँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड, मोबाईल वॉलेट व कॅश कार्डचा पर्याय असून, भरल्यावर पावतीचा तपशीलही मिळतो. ॲपमधून कॉल सेंटरशी संपर्क साधता येतो. ग्राहकांना एकाच खात्यातून अनेक जोडण्यांबाबतची सेवा उपलब्ध आहे. ग्राहकांना मोबाईल क्रमांक व ई-मेल नोंदवता येतो. मीटर रीडिंग न घेतलेल्या ग्राहकांना बिल तयार करण्यापूर्वी एसएमएसद्वारे लिंक पाठवण्यात येणार असून त्यांच्या मोबाईलमधील ॲपद्वारे मीटर रीडिंग घेऊन ते महावितरणकडे पाठवण्याची सोय उपलब्ध आहे. महावितरणच्या सेवेबाबत वीजग्राहकांना फिडबॅक देण्याची सोय ॲपमध्ये आहे.

**वीज बिलावर क्यूआर कोड**

बारकोडपेक्षा लोकप्रिय असलेला क्यूआर (क्विक रिस्पॉन्स) कोड नव्या वीजबिलावर उपलब्ध आहे. या कोडद्वारे वीजग्राहकांना महावितरणचे मोबाईल ॲप थेट डाऊनलोड करता येते. मोबाईलधारकांनी स्मार्टफोनमध्ये असलेल्या किंवा डाऊनलोड केलेल्या क्यूआर कोड रिडरच्या माध्यमातून महावितरणच्या वीजबिलावरील क्यूआर कोड स्कॅन केला की थेट महावितरण मोबाईल ॲपची लिंक उपलब्ध होते. त्याद्वारे महावितरण ॲप डाऊनलोड करता येते.

**महावितरणची ’चॅट बॉट’ सेवा**

ऊर्जा हे चॅट बॉट महावितरणने विकसित केले आहे. कंपनीच्या वेबसाईटवर आणि पवर ते उपलब्ध आहे. महावितरणशी संबंधित ग्राहकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी या चॅट बॉटमध्ये सुविधा आहे. ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे चॅट बॉटद्वारे दिली जातात व त्यातून ग्राहकांना मार्गदर्शन होते. ग्राहकांना त्वरित प्रतिसाद तसेच जलद आणि कार्यक्षम सुविधा प्रदान करणे ही या चॅट बॉटची वैशिष्ट्ये आहेत

मिसकॉल सेवा

याचबरोबर महावितरण तर्फे खंडित वीज पुरवठ्याच्या तक्रारीसाठी मिसकॉल सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे व या क्रमांकात बदल करण्यात आला आहे. ग्राहक नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून महावितरणने उपलब्ध करून दिलेल्या ०२२- ५०८९७१०० या क्रमांकावर मिसकॉल देऊन आपली तक्रार नोंदवू शकतात. ज्या ग्राहकांनी अद्याप आपले मोबाईल क्रमांक महावितरणकडे नोंदवले नाहीत ते ग्राहक, महावितरण मोबाईल पद्वारे किंवा वरील टोल-फ्री क्रमांकावर फोन करून आपला ग्राहक क्रमांक सांगून आपल्या मोबाईल क्रमांकाची नोंद करू शकतात.

**देयकात सुट**

वीज देयक देय दिनांकाच्या अगोदर भरणा करणा-या ग्राहकांना बिल तयार झाल्याच्या सात दिवसांत बिल भरल्यास जवळपास एक टक्के तत्पर देयक भरणा सूट मिळते. तसेच ऑनलाईन बिल भरल्यास ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सूट महावितरणतर्फे देण्यात येत आहे. महावितरणच्या तमाम ’’ग्राहक राजांनी’’ ग्राहक सेवेशी असलेली नाते अधिक द्रढ करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वरील बहु पर्याय सेवांचा लाभ घेवून महावितरण कंपनीस सहकार्य करावे.

– **सुनील जाधव,** उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

---

# महिलांना माहेर आहे, पण अधिकार काहीच नाही



कोर्टामध्ये कागदावर शेवटची सही होताच वकिल हसून म्हणाले. . .

घ्या मॅडम, आता तुमचा घटस्फोट झाला. कोर्टानं तुम्हाला ३० लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिलीये, आणि दर महिन्याला २०, ००० रुपये खर्चासाठी मिळत राहतील. आता खुश ना? ती हलकेसे स्मित करून म्हणाली. . होखुश आहेआता मला कुणाकडून काही नकोय. वकील कागद गोळा करू लागला. आणि कविता आई-वडिलांसोबत बाहेर पडली. कोपऱ्यात निर्वाण-तिचा नवरा-सगळं शांतपणे पाहत उभा होता. कवितेनं एकदाही त्याच्याकडे पाहिलं नाही. गाडीचं दार बंद झालंआणि नातंही.

पहिला महिना- मायकेत सगळे फार प्रेमानं वागले. कवितेला वाटलं-हेच तर स्वातंत्र्य हाच तर शांतपणा!

दुसरा महिना-घरच्यांचा सूर थोडा बदलू लागला. भाऊ कधी रागानं बोलायचा,

वाहिनी टोमणे मारायची- मोठी झालीस, थोडी जबाबदारी घे ना

भाचेही म्हणू लागले. आत्त्या, किती दिवस राहणार इथे?

तिसरा महिना-घरातलं वातावरण बदलू लागलं. जिथं आधी प्रेम होतं, तिथं आता भार वाटू लागला. कविता शांत व्हायचीपण मनात दुख वाढत राहायचं.

चौथा महिना-तिच्या प्रत्येक गोष्टीवर नजरा ठेवायला लागले. बाहेर पडली की शेजारच्यांची खुसफुस-तिचा घटस्फोट झालायआता माहेरीच राहणार?

कवितेच्या आत काहीतरी तुटत होतं.

तिला पहिल्यांदा जाणवलं-सासरी नातं कठीण होतं, पण ते तिचं स्वतःचं घर होतं. माहेरी ती ना पाहुणी, ना घरची-फक्त एक ओझं.

एक रात्री टेरेसवर बसून ती विचार करू लागली. पैसे मिळालेस्वातंत्र्य मिळालं

पण इज्जत? आपुलकी? आणि घर?

ती स्वतःशी कुजबुजली-चूक केलीफैसला घेताना मी फक्त दुःख पाहिलं, पण परिणाम पाहिलेच नाही तिला कळलं-तुटलेल्या नात्यानंतर बाईला सर्वात जास्त आधाराची गरज असते, पण समाज आधी तिला जज करतो. आणि माहेर

माहेर आहे, पण अधिकार काहीच नाही.

माझं खरं घर मी माझ्या अहंकारानं सोडून आले

डोळ्यात पाणी आलं. निर्णयाची किंमत आता समजत होती.

चार महिने पूर्ण झाले

कवितेला रोज एकच प्रश्न सतावू लागला. मी काय गमावलं?

फक्त राग आणि टोमण्यांमध्ये वाहून इतका मोठा निर्णय घेतला?

ती आकाशाकडे बघत बसायचीनिर्वाणच्या आठवणी मागून धावत यायच्या-

त्याच्या सवयी, छोटी भांडणं, आणि सर्वात जास्त-त्याचं साथ देणं.

एका रात्री मन पूर्ण तुटलं.

तिनं फोन उचललानंबर लावला.

कॉल लागला. हॅलो? निर्वाण.

कविता थरथरत्या आवाजात निर्वाणआपणआपल्या नात्याला पुन्हा एक संधी देऊ शकतो का?. मला तुझी फार आठवण येतेमला तुझ्यासोबत राहायचंय

दोन्ही बाजूला काही क्षण शांतता

निर्वाण हळूच म्हणाला- मीही तुझ्याविना राहू शकत नाही

आपली चूक दोघांची होती, सुधारायला दोघांनीच सोबत चालायचंय.

तू ‘हो’ म्हणालीस

तर मी आत्ताच निघतो.

कवितेच्या गालावरून आसवं वाहू लागली.

हो मी तयार आहे.

रात्रीचे १२ वाजले होते. निर्वाण कार घेऊन निघाला. थंडी, सुनसान रस्तापण मनात एकच आवाज तिला परत घरी आणायचं आहे. सलग ५ तास ड्राइव्ह केला. ना थांबला, ना दमला. सकाळी ५ वाजता तो कवितेच्या माहेरच्या दारात उभा होता.

कविता बाहेर आली घाबरलेली, लाजलेलीपण दिल-ासा मिळालेला चेहरा.

आई-वडिलांनी दार उघडलं. निर्वाणनं नम्रपणे प्रणाम केला. कवितेने बॅग उचलली.

ना बोलणं, ना वाद दोघांना कळलं, हे निर्णय मनातून घेतलेलं आहे. कार सुरू झाली

आणि कविता परत तिच्या घराकडे खऱ्या घराकडे निघाली.

प्रिय वाचक मित्रांनो. . . अनेक मित्रांच्या घरातील मुलीच्या मुलांच्या गोष्टी येकायला मिळतात. त्यामुळे घराघरात शांतता भंग पावलेली दिसते. घरात सुखा समाधानाचे आनंदाचे वातावरण राहत नाही. कोणीच उघड बोलू शकत नाही. त्यात काही मुली कोर्टात जा-तात त्यांना आईवडीलच्या आर्थिक परिस्थितीचा गर्व असतो. त्यामुळे शुल्क कारणाने नाती मोडीत निघतात. आज पर्यन्त कोणते ही न्यायालय या नात्यातील निकाल कधीच देऊ शकला नाही. केवळ तारीख वर तारीख!. लाखों केस फाइल बंद होऊन कपाटात पडल्या आहेत. त्यातील काही फक्त कधी कधी त्यावरील धूळ हळूवार साफ करण्याचे काम करत असतात. मुलीचे मुलाचे वय वाढत जाते. दोघेही एकमेकावर लक्ष ठेवून असतात. मी स्वता अनुभव घेण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातील न्यायालयात फेरफटका मारून माहिती घेतली, कर्मचारी पोलिस अधिकारी आणि न्यायमूर्ती दररोज अनेक प्रकारचे मुली मूल त्यांचे पालक पाहत असतात. खरे खोटे त्यांना कळते पण ते निर्णय घेऊ शकत नाही. ही ते अनुभवाने सांगतात कंटाळतील व कोर्टाचा नाद सोडतील ही त्यांची अपेक्षा असते. योग्य वेळी घेतलेलं छोटंसं पाऊल संपूर्ण आयुष्य वाचवू शकतं. रागाच्या क्षणी घेतलेला निर्णय खरंच आपल्या आयुष्याची दिशा बदलण्या इतका योग्य असतो का? हा विचार प्रत्येक मुलीने करणे गरजेचे आहे. त्याचे समर्थन आई वडिलांनी करतांना पुढील येणाऱ्या दिवसाचा गांभीर्याने विचार करावा. लग्न झाल्यावर मुलगा आई वडिलांचा राहत नाही. हा निसर्गाचा नियम झाला आहे. त्याला शिक्षण आणि संस्कार रोखू शकले नाही. न्यायालय सुद्धा रोखण्यास असमर्थ ठरत आहे. असे घटना सोशल मिडियावर पाठवणारे खूप लोक असतात. स्वतःचे नांव गांव नंबर देण्यास घाबरतात. लोक काय म्हणतील ही भीती अनेकच्या मनात प्रचंड असते. असे लेख सहज वाचनात आले की त्यांचा ड्रॉप लेखाचा संग्रह करून ठेवतो. त्यात योग्य तो शाब्दिक बदल करून असा लेख तयार करून वाचका समोर ठेवतो. काही वाचक जागरूक असतात. यातून बोध घेतात. प्रबोधन करतात. रागाच्या भरात नात्यात निर्माण होणाऱ्या दुरावा शांत पणे समजावून सांगतात आणि पूढील दुर्दवी घटना टाळता येतात.

– **सागर रामभाऊ तायडे,** ९९२०४०३८५९, भांडुप, मुंबई.

---

# ‘कमकुवत’ प्रकरणात आरोपपत्र दाखल करु नका

## – सर्वोच्च न्यायालयाचा पोलिसांना मोठा दणका

## – न्यायालयीन यंत्रणेवर अनावश्यक भार

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/पुणे/ प्रतिनिधी**/ ड. महेश एस. धन्नावत, कार्यकारी अध्यक्ष, नोटरी असोसिएशन यांच्या वतीने: ज्या प्रकरणांमध्ये दोषसिद्धीची शक्यता अंधुक आहे, अशा प्रकरणांमध्ये पोलिसांकडून आरोपपत्र दाखल करणे आणि ट्रायल कोर्टाकडून आरोप निश्चित करण्याच्या प्रथेवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. हा न्यायव्यवस्थेचा वेळ वाया घालवणारा आणि निरपराध नागरिकांना त्रास देणारा प्रकार आहे, असे खणखणीत मत ड. महेश एस. धन्नावत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर व्यक्त केले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंग आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने एका मालमत्ता विवादातील आरोपीला दोषमुक्त करताना हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणात कोणताही फौजदारी गुन्हा सिद्ध होत नाही आणि पक्षकारांमधील दिवाणी वाद पाहता या प्रकरणाला फौजदारी रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

न्यायालयाची महत्त्वपूर्ण निरीक्षणे:

न्यायमूर्ती मनमोहन यांनी लिहिलेल्या निकालात म्हटले आहे की, ज्या प्रकरणांमध्ये कोणताही ठोस संशय निर्माण होत नाही, अशा प्रकरणांमध्ये आर-ोपपत्र दाखल करण्याच्या प्रवृत्तीमुळे न्यायालयीन यंत्रणा तुंबते. यामुळे न्यायाधीश, न्यायालयीन कर्मचारी आणि सरकारी वकील यांचा वेळ अशा खटल्यांवर वाया जातो, ज्यात अखेरीस निर्दोष मुक्तता होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे मर्यादित न्यायालयीन संसाधने अधिक गंभीर आणि महत्त्वाच्या प्रकरणांपासून दूर ढकलली जातात, ज्यामुळे खटल्यांचा प्रचंड अनुशेष निर्माण होतो.

न्यायालयाने पुढे म्हटले की, जेव्हा पक्षकारांमध्ये दिवाणी वाद प्रलंबित असतो, तेव्हा पोलिसांनी आर-ोपपत्र दाखल करताना आणि फौजदारी न्यायालयाने आरोप निश्चित करताना अत्यंत सावधगिरी बाळ-गली पाहिजे. कायद्याच्या राज्याने शासित समाजात, आरोपपत्र दाखल करण्याचा निर्णय तपास अधिकाऱ्याने गोळा केलेल्या पुराव्यांवरून घेतला पाहिजे, ज्यात दोषसिद्धीची वाजवी शक्यता आहे का हे तपासले पाहिजे. पोलीस आणि फौजदारी न्यायालयाने सुरुवातीलाच एक फिल्टर म्हणून काम केले पाहिजे, जेणेकरून केवळ मजबूत संशय अस-लेली प्रकरणेच औपचारिक खटल्याच्या टप्प्यावर जातील. यामुळे न्यायालयीन यंत्रणेची कार्यक्षमता आणि अखंडता टिकून राहील.

न्यायालयाने यावर जोर दिला की, आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यावर खटल्याचा निकाल दोषसिद्धी की निर्दोष मुक्ततेत होईल याचे विश्लेषण केले जाऊ शकत नाही, हे निःसंशय आहे. परंतु, मूलभूत तत्त्व हे आहे की, राज्याने नागरिकांवर दोषसिद्धीच्या वाजवी शक्यतेशिवाय खटला चालवू नये, कारण यामुळे निष्पक्ष प्रक्रियेच्या अधिकाराशी तडजोड होते.

प्रकरणाची पार्श्वभूमी:

हे प्रकरण मार्च २०२० मध्ये दाखल झालेल्या एका एफआयआरमधून उद्भवले. तक्रारदार महिलेने दावा केला होता की, ती कोलकाता येथील सॉल्ट लेक मालमत्तेच्या सह-मालकाची भाडेकरू आहे. जेव्हा तिने मित्र आणि कामगारांसह मालमत्तेत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपी आणि इतर व्यक्तींनी तिच्या संमतीशिवाय तिचे फोटो/व्हिडिओ काढले आणि तिला धमकावले.

न्यायालयाच्या निदर्शनास आले की हा वाद दोन भावांमधील दिवाणी मालमत्तेच्या लढाईतून निर्माण झाला होता, जे मालमत्तेचे सह-मालक होते. या प्रकरणी दिवाणी खटला प्रलंबित होता आणि दिव-ाणी न्यायालयाने २९ नोव्हेंबर २०१८ रोजी मनाई हुकूम दिला होता, ज्यात दोन्ही भावांना संयुक्त ताबा ठेवण्याचे आणि कोणताही तृतीय-पक्षीय हक्क निर्माण करण्यापासून रोखण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने आपली निरीक्षणे नोंदवली आणि पोलीस व ट्रायल कोर्टांना अशा प्रकरणांमध्ये अधिक काळजीपूर्वक काम करण्याचा इशारा दिला, जिथे पक्षकारांमध्ये आधीच समांतर दिवाणी कारवाई प्रलंबित आहे.




# प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे जनतेचे हाल; माजी आमदार हर्षवर्धन जाधव कडाडले!

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** सरकारच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि निधीअभावी सर्वसामान्यांची विकासकामे रखडली आहेत. केवळ पोकळ आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल केली जात आहे, अशा प्रखर शब्दांत कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी विद्यमान सत्ताधारी आणि प्रशासनावर तोफ डागली. कन्नड तालुक्यात सध्या जाधव यांच्या जिल्हा परिषद सर्कल मेळाव्यांनी राजकीय वातावरण तापले असून, पिशोर आणि दिगाव खेडी येथील सभेत त्यांनी प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले.



निधीअभावी विकासकामांचा 'खोळंबा'

गुरुवारी १८ डिसेंबर रोजी पिशोर येथील महादेव मंदिर सभागृहात आणि २३ डिसेंबर रोजी दिगाव खेडी येथे हे मेळावे पार पडले. दिगाव खेडी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून सभेची सुरुवात झाली. रात्री १० वाजेपर्यंत कडाक्याची थंडी असतानाही शेकडो ग्रामस्थ जाधव यांचे विचार ऐकण्यासाठी ठामपणे उभे होते. यावेळी बोलताना जाधव म्हणाले की, आज तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते रखडले आहेत, विहीर आणि गाय गोठ्याचे पैसे मिळत नाहीत. १५ व्या वित्त आयोगाचा निधी न मिळाल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार रखडले आहेत. हा सर्व प्रकार म्हणजे प्रशासकीय दिवाळखोरीचे लक्षण आहे.

तरुणांची फसवणूक आणि योजनांचा बोजवारा

